RNI No. MAHBIL /2009/35527
Reg. No. MH/MR/South-343/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ६, अंक १५] गुरुवार, मे ८, २०१४/वैशाख १८, शके १९३६ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

### अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/टीआरएफ/एमवायटी-विनियम/२०१४/०२५७.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ.**—(१) या विनियमांना, " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (तिसरी सुधारणा) विनियम, २०१४," असे म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **विनियम १३.१ मध्ये सुधारणा.**—महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( बहु-वर्षीय वीज दर ) विनियम, २०११, मधील (ज्यास येथून पुढे " बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ " म्हणून संबोधण्यात आले आहे) विनियम १३.१ ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

१३.१ " निर्मिती कंपनीला (या विनियमांच्या विनियम ४९.६ नुसार निर्मिती कंपनीसाठी तरतूद करण्यात आलेले समायोजन वगळता) किंवा वितरण परवानाधारकाला इंधन आणि वीज खरेदी खर्चातील तफावतीमुळे नियंत्रण न करण्यासारख्या घटकांमुळे होणारा मान्यताप्राप्त एकूण नफा किंवा तोटा ग्राहकांना झेड-घटक आकाराच्या इंधन समायोजन खर्चाच्या भागाखाली ($Z_{FAC}$) लागू करण्यात येईल; या भागाचे मासिक तत्त्वावर निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारकाच्या वीज दरात समायोजन, या विनियमांखाली ठरवून देण्यात आल्याप्रमाणे आणि या विनियमांखाली आयोगाने पारित केलेल्या आदेशात निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, करण्यात येईल."

३. **विनियम १३.२ मध्ये सुधारणा.**—बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम १३.२ वगळण्यात आला आहे.

४. **विनियम १३.३ मध्ये सुधारणा.**—बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम १३.३ वगळण्यात आला आहे.

५. **विनियम १३.७ मध्ये सुधारणा.—**बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम १३.७ ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईल:—

१३.७ " दुसऱ्या नियंत्रण कालावधीत $Z_{FAC}$ ला (झेड-घटक आकाराच्या इंधन समायोजन खर्चाच्या भागाला) पहिली मान्यता वितरण परवानाधारक आयोगाला, दुसऱ्या नियंत्रण कालावधित वसूल करावयाच्या आयोगाने ठरवून दिलेल्या $Z_{FAC}$ ला मंजुरी मिळण्यासाठी, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्याकरिता, केलेला खर्च व आयोगाने मान्यता दिलेली रक्कम यातील तफावतीच्या तपशीलासह अन्य तपशील, आणि आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असणारी तपशीलवार परिगणना आणि त्यास पुष्टी देणारे दस्तावेज, विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यात, सादर करेल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्याकरिता, स्वतःच्या निर्मिती केंद्रातून निर्माण केलेल्या विजेशी संबंधित इंधन खर्चाचा आणि केलेल्या वीज प्राप्तीवरील खर्चाचा तपशील, पहिला महिना पूर्ण झाल्यानंतर, सादर करेल :

परंतु आणखी असे की, आयोग, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील त्यानंतरच्या महिन्यांत वसूल करावयाच्या, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्याकरिता $Z_{FAC}$ ला, आवश्यक छाननीच्या अधीन राहून, मान्यता देईल :

परंतु आणखी असे की, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्याकरिता वितरण परवानाधारकाने जर इंधन समायोजन खर्च (FAC) यापूर्वीच आकारला असेल तर, पहिल्या महिन्याकरिता आकारलेल्या $Z_{FAC}$ ला, वितरण परवानाधारक कार्योत्तर मंजुरी घेईल."

६. **विनियम १३.८ मध्ये सुधारणा.—**बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम १३.८ ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

१३.८ " दुसऱ्या नियंत्रण कालावधित $Z_{FAC}$ ला (झेड-घटक आकाराच्या इंधन समायोजन खर्चाच्या भागाला) नंतरच्या मान्यता

वितरण परवानाधारक आयोगाला, $Z_{FAC}$ ला, कार्योत्तर मंजुरी मिळण्यासाठी, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील नंतरच्या महिन्यांकरिता तिमाही तत्त्वावर, केलेला खर्च व आयोगाने मान्यता दिलेली रक्कम यातील तफावतीच्या तपशीलासह अन्य तपशील आणि आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असणारी तपशीलवार परिगणना आणि पुष्टी देणारे दस्तावेज, विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यात, सादर करेल :

परंतु असे की, नियंत्रण कालावधितील पहिल्या वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये नियंत्रण कालावधितील पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्याचा समावेश असेल, ज्याकरिता मंजुरी घेणे आवश्यक असेल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, दुसऱ्या नियंत्रण कालावधितील नंतरच्या महिन्यांकरिता, स्वतःच्या निर्मिती केंद्रातून निर्माण केलेल्या विजेशी संबंधित इंधन खर्चाचा आणि केलेल्या वीज प्राप्तीवरील खर्चाचा तपशील तिमाही तत्त्वावर, प्रत्येक तिमाही पूर्ण झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत, कार्योत्तर मंजुरी मिळण्यासाठी, सादर करेल :

परंतु असे की, वसुली-योग्य $Z_{FAC}$ च्या तुलनेत मागील तिमाहीत सर्व ग्राहकांना लागू करण्यात आलेल्या $Z_{FAC}$ ची माहिती वितरण परवानाधारक सादर करेल व त्यासोबत आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असलेली सविस्तर परिगणना आणि पुष्टी देणारी कागदपत्रे पाठवेल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, $Z_{FAC}$ लागू करण्यासाठी आयोगाने दिलेल्या मंजुरीचा तपशील, त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करेल. "

७. **विनियम १३.९ मध्ये सुधारणा.—**बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम १३.९ ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

१३.९ "झेड-घटक आकाराच्या इंधन समायोजन खर्चाच्या (एफएसी) भागाच्या परिगणनेसाठी वापरावयाचे सूत्र खालीलप्रमाणे राहील :—

$Z_{FAC}$(Rs. Crore) = F + C + B,

जेथे,

$Z_{FAC}$ = झेड घटक आकार – $n^{th}$ महिन्याकरिता इंधन समायोजन खर्चाचा (एफएसी) भाग

F = स्वतःच्या वीज निर्मितीसाठीच्या इंधन खर्चात आणि वीज खरेदीच्या खर्चातील बदल

C = स्वतःच्या वीज निर्मितीसाठीच्या इंधन खर्चात आणि वीज खरेदीच्या खर्चातील बदलामुळे झालेल्या कोणत्याही कमी वसुली/ज्यादा वसुलीबाबतचा आनुषंगिक खर्च, ज्याची परिगणना $n^{th}$ महिन्याच्या सुरुवातीला प्रचलित असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ॲडव्हान्स दराने करण्यात आलेली असेल ;

B = कमी वसुली/ जादा वसुलीकरिता समायोजन घटक

"n" महिन्याकरिता आकारावयाच्या इंधन समायोजन खर्चाची (एफएसी) परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :–

$FAC_n$ (Rs. Crore) = $F_{n-2} + C_{n-2} + B_{n-2}$

**स्पष्टीकरण १.–** या विनियमाच्या प्रयोजनासाठी, "F" या संज्ञेची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :–

F (Rs. Crore) = $A_{FC,Gen} + A_{FC,PP,}$

जेथे,

$A_{FC,Gen}$: स्व-निर्मितीच्या इंधन खर्चातील बदल. या बदलाची परिगणना, उष्मांक दर, सहाय्यकारी वापर, इ.सह, आयोगाने दिलेले निकष आणि निर्देश यांच्या आधारे करण्यात येईल.

$A_{FC,PP}$: अन्य स्रोतांकडून केलेल्या वीज प्राप्तीवरील अस्थिर आणि/ किंवा स्थिर खर्चामधील बदल. हा बदल, या विनियमात विहित केलेल्या आणि विद्यमान बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशातील निकषांची पूर्तता करीत असलेल्या मर्यादेपर्यंत आणि लागू असणाऱ्या निकषांच्या अधीन राहून, अनुज्ञेय राहील.

**स्पष्टीकरण २.—** या विनियमाच्या प्रयोजनासाठी, "C" या संज्ञेचा अर्थ स्व-निर्मितीला लागणाऱ्या इंधन खर्चातील आणि वीज खरेदीच्या खर्चातील बदलामुळे होणारा आनुषंगिक खर्च, असा राहील :

**स्पष्टीकरण ३.—** या विनियमाच्या प्रयोजनासाठी, "B" या संज्ञेची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :–

$B_{n-2}$ (Rs. Crore) = $Z_{FACn-4} - R_{n-2}$

जेथे,

$B_{n-2}$ = "n-2" महिन्याकरिता कमी वसुली/जादा वसुलीकरिता समायोजन घटक

$Z_{FACn-4}$ = "n-4" महिन्याकरिता $Z_{FAC}$

$R_{n-2}$ = "n-2" महिन्यात "n-4" महिन्याकरिता प्रत्यक्ष वसूल केलेला $Z_{FAC}$

परंतु असे की, मासिक इंधन समायोजन खर्च (एफएसी) आकार हा वीज दरातील अस्थिर भागाच्या २० टक्क्यांपेक्षा, किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य मर्यादेपेक्षा, जास्त नसेल :

परंतु आणखी असे की, वरीलप्रमाणे ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वसूल करण्यात आलेला कोणताही एफएसी आकार हा वितरण परवानाधारकाकडून पुढे खेचण्यात येईल व त्याची वसुली आयोग निर्देश देईल अशा भावी कालावधित करण्यात येईल. "

१३.९.१ झेड-घटक आकाराच्या एकूण वसुली-योग्य एफएसी भागाची वसुली, वर विनिर्दिष्ट केलेल्या सूत्रानुसार, प्रत्यक्ष विक्रीमधून ' रुपये प्रति युनिट ' याप्रमाणे करण्यात येईल :

परंतु असे की, मीटर न बसविलेल्या ग्राहकांच्या बाबतीत, आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पद्धतीस अनुसरून अशा ग्राहकांना परिगणना केलेल्या अंदाजित विक्रीच्या आधारे काढलेला, झेड-घटक आकाराचा एफएसी भाग वसुली-योग्य राहील :

परंतु असे की, आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपेक्षा वितरण परवानाधारकाची प्रत्यक्ष वितरण हानी जेव्हा जास्त होते तेव्हा, अशा जादा वितरण हानीशी (युनिटमधील) सममूल्य झेड-घटक आकाराच्या एफएसी भागाची रक्कम ही झेड-घटक आकाराच्या वसुली-योग्य एकूण एफएसी भागातून कमी करण्यात येईल :

विशिष्ट वीज दरातील ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापराचा टप्पा याकरिता युनिट $Z_{FAC}$ ची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :–

$Z_{FAC\ Cat\ Rs/kWh}$ = (Z / (Metered sales + Unmetered consumption estimates + Excess distribution losses)) * k* 10

जेथे,

$Z_{FAC\ Cat}$ - झेड- घटक आकाराच्या संबंधात, विशिष्ट वीज दरातील ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापराचा टप्पा याकरिता " रुपये प्रति युनिट " मधील एफएसीचा भाग

k= Average Billing Rate /ACOS

Average Billing Rate = म्हणजे विचाराधीन असलेल्या विशिष्ट वीज दर ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापराचा टप्पा याकरिता आयोगाने वीज दराच्या आदेशात मान्यता दिलेला " रुपये प्रति युनिट " सरासरी आकारणीचा दर :

परंतु असे की, मीटर नसलेल्या ग्राहकांकरिता सरासरी आकारणीचा दर हा आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार परिगणना केल्याप्रमाणे अशा ग्राहकांना केलेल्या अंदाजित विक्रीवर आधारित असेल.

ACOS= म्हणजे आयोगाने वीज दराच्या आदेशात वसुलीसाठी मान्यता दिलेला

" रुपये प्रति युनिट " मधील " वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च "

८ **विनियम १३.१० मध्ये सुधारणा.**—बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम १३.१० ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

१३.१० " झेड-घटक आकाराचे अन्य भाग ($Z_{OUC}$)

निर्मिती कंपनीला (या विनियमांच्या विनियम ४९.६ नुसार निर्मिती कंपनीसाठी तरतूद करण्यात आलेले समायोजन वगळता) किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाला (इंधन आणि वीज खरेदीच्या खर्चातील तफावत वगळून अन्य ) नियंत्रण न करण्यासारख्या घटकांमुळे होणारा मान्यताप्राप्त एकूण नफा किंवा तोटा ग्राहकांना झेड-घटक आकाराच्या ($Z_{OUC}$) अन्य नियंत्रण न करण्यासारख्या खर्चाच्या भागा खाली, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या वीज दरात एक समायोजन म्हणून, या विनियमांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आणि या विनियमांतर्गत आयोगाने पारित केलेल्या आदेशात निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, वार्षिक तत्त्वावर लागू करण्यात येईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक $Z_{OUC}$ चा तपशील आयोगाची $Z_{OUC}$ ला मान्यता घेण्यासाठी सादर करेल आणि, या प्रयोजनासाठी, केलेला खर्च व आयोगाने मान्यता दिलेली रक्कम यातील तफावतीच्या तपशीलासह आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असणारी तपशीलवार परिगणना आणि पुष्टी देणारे दस्तावेज सादर करेल :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक विनियम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नियंत्रण न करण्यासारख्या कोणत्याही घटकामुळे झालेल्या खर्चातील तफावतीची माहिती वार्षिक तत्त्वावर सादर करेल :

परंतु आणखी असे की, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार आवश्यक छाननीच्या अधीन राहून आयोग, दुसऱ्या नियंत्रण कालावधीत वसूल करावयाच्या $Z_{OUC}$ ला वार्षिक तत्त्वावर मान्यता देईल."

९ **विनियम ४९.६ मध्ये सुधारणा.**—बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ मधील विनियम ४९.६ ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईल:—

४९.६ " इंधनांच्या किंमती किंवा उष्मांक मूल्याच्या किंमतीमधील तफावतींमुळे ऊर्जा आकाराच्या दराचे (आरइसी) समायोजन (इंधन अधिभार समायोजन)

वीज निर्मिती केंद्रासाठी निर्मिती कंपनीने प्राप्त करून घेतलेल्या आणि प्रज्वलित केलेल्या कोळसा/लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधनाच्या शिल्लक साठ्याचे सरासरी एकूण कॅलरीफिक मूल्य आणि कोळसा/लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधन प्राप्त करून घेण्यासाठी निर्मिती कंपनीने केलेला भारांकित सरासरी उतरवणुकीचा खर्च, जसे असेल तसे, यांच्या आधारे कोळसा/लिग्नाइट, तेल, किंवा वायू किंवा द्रव इंधन यांची किंमत व एकूण कॅलरीफिक मूल्य, यांच्या मान्यता दिलेल्या मूल्यांच्या तुलनेतील तफावतीचे समायोजन मासिक तत्त्वावर करण्यात येईल. निर्मिती कंपनी त्यांच्या देयकांमध्ये आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या प्रमुख आणि दुय्यम इंधनाच्या बेस किंमतीनुसार ऊर्जा आकारांचा दर आणि इंधन अधिभार वेगवेगळा निर्देशित करेल. निर्मिती कंपनी केलेली परिगणना आयोगास मासिक तत्त्वावर इंधन अधिभार समायोजनास कार्योत्तर मंजुरीसाठी, विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यांत, आणि केलेला खर्च व आयोगाने मान्यता दिलेली रक्कम यातील तफावतीच्या तपशीलासह आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असणारी तपशीलवार परिगणना आणि पुष्टी देणारे दस्तावेज, सादर करेल. "

**अश्वनी कुमार,**

सचिव,

मुंबई, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग .

८ मे २०१४.

**टीप.**—महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ दिनांक ४ फेब्रुवारी २०११ रोजी **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात आले. या विनियमांमध्ये पहिली सुधारणा, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०११ द्वारे दिनांक २१ ऑक्टोबर २०११ रोजी करण्यात आली आणि दुसरी सुधारणा, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१३ द्वारे दिनांक १७ फेब्रुवारी २०१४ रोजी करण्यात आली.